**फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र संस्थेमधील अभ्यासक्रमांना द्यावयाच्या विविध शासन मान्यतांबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/प्र.क्र.१७७/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२२.

वाचा : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/पीसीआय/२०२२/९१४, दि.३०.०९.२०२२.

**प्रस्तावना :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त नमूद दि.३०.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून Annexure - A मध्ये नमूद राज्यातील विद्यमान डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या बी.फार्मसी व एम.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, नवीन फार्म.डी. अभ्यासक्रम सुरू करणे इ. साठी तसेच Annexure - B मध्ये नमूद विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थांच्या नावामध्ये बदल करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून Annexure - A मध्ये नमूद राज्यातील विद्यमान डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या बी.फार्मसी व एम.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, नवीन फार्म.डी. अभ्यासक्रम सुरू करणे इ. साठी तसेच Annexure - B मध्ये नमूद विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थांच्या नावामध्ये बदल करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

**अटी व शर्ती**

१) सदर मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस

Scanned with CamScanner

बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.



Scanned with CamScanner

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१०१२१३१२४७१००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2022.10.13 12:20:50 +05'30'

(नि. ज्यो. घिरटकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३) सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५) संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) फार्मसी कौंन्सिल ऑफ इंडिया,कम्बाइन्ड कौंन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
७) अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११०००१.
८) सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९) विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०) निवड नस्ती/तांशि-४.



Scanned with CamScanner

Annexure - A

Higher and Technical Education Department Government Resolution No.Manyata-2022/C.R.177/TE-4, Dated- 12th October, 2022

List of New Course, Increase in intake in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2022-23

| SR. NO. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | UNIVERSITY NAME | APPROVED INTAKE A.Y. 2021-22 | INTAKE APPROVED BY PCI A.Y.2022-23 | VARIATION |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | 5155 | PCI-521 | Dhulia Charitable Society's Annasaheb Ramesh Ajmera College of Pharmacy, Nagaon | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutical Chemistry | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | 0 | 15 | 15 |
| 23 | 5155 | PCI-521 | Dhulia Charitable Society's Annasaheb Ramesh Ajmera College of Pharmacy, Nagaon | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacology | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | 0 | 9 | 9 |
| 24 | 5421 | PCI-1609 | Pravara Rural Education Society's College of PHarmacy (D.Pharm), Chincholi | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | 0 | 60 | 60 |
| 25 | 6820 | PCI-36 | Adarsh College of Pharmacy, Vita Dist. Sangli | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutics | Shivaji University | 0 | 15 | 15 |
| 26 | 6820 | PCI-36 | Adarsh College of Pharmacy, Vita Dist. Sangli | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacology | Shivaji University | 0 | 6 | 6 |
| 27 | 6393 | PCI-134 | Samarth Education Trust Arvind Gavali college of Pharmacy, Satara | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacology | Shivaji University | 0 | 6 | 6 |
| 28 | 6393 | PCI-134 | Samarth Education Trust Arvind Gavali college of Pharmacy, Satara | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutical Chemistry | Shivaji University | 0 | 15 | 15 |
| 29 | 5443 | PCI-531 | Divine College of Pharmacy, Satana | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutics | Savitribai Phule Pune University | 0 | 9 | 9 |
| 30 | 5209 | PCI-1076 | Kai Yashodabai Dagadu Saraf Charitable Trust's College of Pharmacy, Sakegaon | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | 60 | 100 | 40 |
| 31 | 3236 | PCI-1140 | Konkan Gyanpeeth Rahul Dharkar College of Pharmacy & Research Institute, Karjat, Dahivali, Karjat Dist. Raigad | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutics | Mumbai University | 0 | 15 | 15 |
| 32 | 3236 | PCI-1140 | Konkan Gyanpeeth Rahul Dharkar College of Pharmacy & Research Institute, Karjat, Dahivali, Karjat Dist. Raigad | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutics | Mumbai University | 0 | 15 | 15 |

Scanned with CamScanner